
Marathi

# एकविसाव्या शतकातील गंगावतरण



-पं. श्रीराम शर्मा आचार्य

# एकविसाव्या शतकातील गंगावतरण

लेखक

पं० श्रीराम शर्मा आचार्य

Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

# विषय सूची


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | एकविसाव्या शतकातील गंगावतरण | ३ |
| २. | सदुपयोग न होऊ शकण्याची विडंबना | ४ |
| ३. | आजची सर्वात महत्त्वाची गरज | ५ |
| ४. | प्रयोगाचा शुभारंभ आणि विस्तार | ६ |
| ५. | प्रखर प्रेरणेचे प्राणवान तंत्र | ८ |
| ६. | लोकसेवी कार्यकर्त्यांची जडण-घडण | ९ |
| ७. | विज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय | १२ |
| ८. | घरोघरी जागृतीची हाक व प्रेरणा देणारे दीपयज्ञ | १२ |
| ९. | संधिकाळ व एकविसाव्या शतकातील अवतरण | १४ |
| १०. | भावी संभावना-भविष्य कथन | १५ |
| ११. | एकविसाव्या शतकाची आध्यात्मिक गंगोत्री | १८ |
| १२. | या पूर्णाहुतीचे सत्परिणाम | २० |
| १३. | प्रशिक्षण सत्रांची व्यवस्था | २२ |
| १४. | आपल्या काळातील महान आंदोलन-स्त्री जागृती | २२ |
| १५. | विचार क्रांती-जन मनाचे शोधन व उन्नयन | २५ |
| १६. | सृजन कार्यांसाठी समयदान | २७ |
| १७. | दैवी सत्तेचे सूत्र संचालन | २९ |





Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

# एकविसाव्या शतकातील गंगावतरण

गेल्या तीनशे वर्षांमध्ये भौतिक विज्ञान व प्रत्यक्षवादी ज्ञानाचा अनन्य साधारण विकास व विस्तार झाला आहे. उपलब्ध बाबींचा सदुपयोग होऊ शकला नाही, तर ते फार मोठ्या दुर्दैवाचे एक कारण बनते. असेच या शतकांमध्ये होत आले आहे. परिणामी आपण अभावग्रस्त प्राचीन काळाच्या तुलनेत कितीतरी जास्त विपन्न, उद्विग्न परिस्थितींमध्ये जगत आहोत.

वायू प्रदुषण, जल प्रदूषण, घातक विकिरणे, वाढते उष्णतामान, आण्विक आणि रासायनिक शस्त्रास्त्रे अशा परिस्थिती उत्पन्न करीत आहेत, ज्यामध्ये मानवाच्या अस्तित्वाचे रक्षणच कठीण होईल. ध्रुवावरील बर्फ वितळावे, सागरांमध्ये प्रचंड भरती यावी हिमयुगाचे पुनरागमन व्हावे, पृथ्वीचे रक्षण करणाऱ्या ओझोन कवचामध्ये वाढत जाणारी छिद्रे, पृथ्वीवर घातक ब्रह्मांडीय किरणांचा वर्षाव पृथ्वीवर जे काही सुदंर दिसत आहे, ते सर्व जळून-भाजून राखरांगोळी व्हावी अशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या विज्ञानाच्या-विकासाची कशी वाहवा करावी ? भले ही त्याने काही सुख साधने वाढविली असतील.

यास विज्ञान विकास जन्य उन्मादच म्हटले पाहिजे. यानेच गेल्या विसाव्या शतकात दोन जागतिक महायुद्धे घडवून अपार जीवित व वित्तहानी केली. लहान सहान युद्धांची याच काळातील संख्या शेकडोंच्या घरात जाऊन पोहचते. धरती मातेच्या समस्त खनिज संपत्तीचे दोहन करून टाकण्याची ही योजना आहे. अंतराळ युद्धाचे असे नियोजन सुरू आहे की ज्या योगे पृथ्वी व आकाशात राहणाऱ्या वनस्पती व प्राण्यांचा कसलाच मागमूस उरणार नाही.

प्रत्यक्षवादी विचार प्रणालीने आत्मा, परमात्मा, कर्मफळ, नीतिमत्ता, निष्ठा या सारख्या आदर्शांच्या महिमेस एका कोपऱ्यात ठेवले आहे. तात्कालिक लाभच सर्वस्व बनला आहे, भले ही मग त्यासाठी कितीही बदमाशी व निष्ठुरपणाचा अवलंब का करावा लागू नये. असे वाटते की वर्तमान विचारप्रवाह मनुष्यास पशु बनविण्यास निघाला आहे आणि विशेष चिंतनीय बाब म्हणजे



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

त्यावर मर्यादा व मनाई यांचा कुठलाच अंकुश नाही.

विनोदाचे, थट्टा-मस्करीचे माध्यम मुख्यतः कामुकताच आहे, या विकृत माध्यमाने स्त्री-पुरुषांदरम्यान असलेल्या मर्यादारूपी कुंपणास तर खंडित केलेच आहे, शिवाय स्वैर यौनाचाराच्या भोवऱ्यात देखील गुरफटून टाकले आहे. परिणाम समोर आहेतच गर्भ निरोधाचे लाख प्रयत्न सुरू असले तरी लोक संख्या एवढ्या तीव्र वेगाने वाढत आहे की, भावी पिढीसाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व कामधंदा इत्यादी जीवनावश्यक मुलभूत गरजा भागविणेच कठीण होऊन जाईल. एवढेच काय तर रस्त्यांवर धावणाऱ्या गाड्या सुद्धा बंद कराव्या लागतील. ही लोक संख्या वाढ अशीच तीव्र व निरंकुश राहिली तर विकासासाठी तयार होत असलेल्या योजनांपैकी एकटी फलद्रुप होण्याची, अभिष्ट उद्दिष्ट साध्य होण्याची सुतराम शक्यता नाही. क्षुधार्त लांडगे आपापसात लढून एकमेकास फाडून टाकतात. वाढत्या लोकसंख्येची समस्या अशीच स्फोटक बनली तर मनुष्य सुद्धा त्याच स्तराप्रत पोहचू शकतो.

## सदुपयोग न होऊ शकण्याची विडंबना

प्रगतीच्या नावाखाली जे प्राप्त झाले होते, त्याचा सदुपयोग चांगल्या कार्यांसाठी, सार्वजनिक हितार्थ केल्या गेला असता तर, आज जग किती सुंदर, सुखी, संपन्न व उन्नत झाले असते, याची कल्पना सहजच येऊ शकते. परंतु दुर्दैव तर बघा, की त्याने समंजस व शहाणे म्हणविल्या जाणाऱ्यांना स्वार्थाच्या साखळदंडांनी करकचून बांधून टाकले आहे व जे हाती लागले त्याचा दुरुपयोग करण्यासाठीच प्रवृत्त केले आहे. त्याचे परिणाम समोर दिसतातच. गरीब असो की श्रीमंत, हे सर्वच साधनांच्या बाबतीत असंतुष्ट आहेत व कुबेरा प्रमाणे वैभवशाली बनू इच्छितात. मिळून मिसळून सर्वांनी समान उपभोग घेण्याची कोणाचीच इच्छा नाही. एक दुसऱ्याचे शोषण-दोहन करण्यासाठीच आतुर, निरंतर चिंतातुर, असंतुष्ट, उद्विग्न आणि व्याकूळ बनून जगताहेत. वरपांगी डामडौल पाहून प्रगतीचा भ्रम तर होतो, परंतु वस्तुतः मनुष्य आपले शारीरिक, मानसिक, आर्थिक



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

व सामाजिक आरोग्य पूर्ण पणे गमावून बसला आहे. स्मशानातील भूत-पिशाच्चांप्रमाणे शंकाग्रस्त होत व बेचैन करणाऱ्या काळजीत भीत-भीत जीवन कसेबसे जगतो आहे. हे समस्त समस्यांचे जाळे केवळ भ्रांती व असामंजास्यावर उभे आहे. योग्य विचार करण्याची आणि चांगले जीवन जगण्याची कला समजून घेऊन आत्मसात केली असती, तर आज जगात सर्वत्र प्रगती, आनंद व सुख शांतीचे वातावरणच राहिले असते. स्नेह, सौजन्य, सद्भाव व सहयोगाच्या वातावरणात प्रत्येकाला उल्हास व आनंदाचाच अनुभव झाला असता.

या उलट आज सर्वत्र अनाचाराचाच बोलबाला दिसून येतो. जे शांती व संतोषपूर्वक जीवन जगत आहेत, ते अगदीच अत्यल्प म्हणजे बोटांवर मोजण्या इतपतच आहेत. कुकृत्ये ही कुविचारांचीच देणगी आहे. विक्षोभ हा भ्रांतिग्रस्त झाल्यावरच त्रस्त करतो. आजची प्रमुख समस्या म्हणजे-विचार विकृती, आस्था संकट, भ्रांतींचा धुमाकूळ व कुविचारांचे साम्राज्य, हे मूळ नष्ट केल्याविना काट्यां प्रमाणे विखुरलेल्या दुःख आणि कष्टांपासून सुटका होणार नाही. विषवृक्ष कापल्या विना सुख-शांतीची आशा कशी बरे करता येईल ?

## आजची सर्वात महत्त्वाची गरज

विचारक्रांतीचा व्यापक प्रचार-प्रसार हे या काळातील सर्वात मोठे व अत्यावश्यक कार्य आहे. वाईट व दुष्ट तत्त्वांशी तसेच राक्षसी व पशुवृत्तींशी संघर्ष केला जावा आणि मानवी गौरवानुरूप मर्यादांचे पालन व निषिद्ध बाबींपासून दूर राहण्याचे अनुशासन स्वीकारण्यास प्रत्येकास विवश केले जावे. नवयुगाच्या अवतरणाचा व सत्ययुगाच्या पुनरागमनाचा हाच एकमेव उपाय आहे. हा जगातील सर्व लोकांवर व क्षेत्रांवर लागू केला जावा. हीच आहे धर्म धारणा व सत्य, प्रेम व न्यायाची आराधना. यापेक्षा दुसरे मोठे कोणतेच पुण्य-परमार्थ असू शकत नाही. हेच ते महाभारत आहे, ज्याच्यासाठी महाकालाने प्रत्येक प्रखर प्राणवान व्यक्तीस हाक दिली आहे. हा मोर्चा जिंकताच उज्ज्वल भविष्याच्या निर्मितीमध्ये थोडी



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

सुद्धा शंका राहणार नाही. एकविसाव्या शतकाची ज्ञानगंगा दुर्लभ राहणार नाही. प्रत्येकाला तिचा लाभ घेण्याची संधी मिळेल.

विचार क्रांतीची व्यापक तयारी करायला हवी. शहाण्या सुरत्या लोकांच्या डोक्यावर नाचत असलेला मूर्खपणाचा उन्माद घालवला पाहिजे. या साठी लोखंडाने लोखंड कापण्याच्या, काट्याने काटा काढण्याच्या नीतीचा अवलंब करावा लागेल. सद्‌विचारांचे एवढे प्रचंड उत्पादन व वितरण करावे लागेल की शोक, संताप शोधूनही कुठेच सापडणार नाही.

हे कार्य फार मोठे व खूप व्यापक आहे. ६५० कोटी मानवांच्या "ब्रेन वॉशिंग" चा प्रश्न आहे. या प्रयत्नात अवांछनीय बाबींची काट छाट करण्या बरोबरच, मानवी गौरवांनुरूप औदार्य संपन्न विवेकशीलतेची स्थापना केली गेली पाहिजे. ऐक्य व समतेच्या छत्रछायेखाली येण्याचे प्रत्येकाला आमंत्रणच देऊ नये तर त्यांना बाध्य सुद्धा करावे लागेल.

या साठी शुभारंभ कसा व कोठून करावा ? हा मांजरीच्या गळ्यात घंटी बांधण्या सारखा अवघड प्रश्न आहे. या साठी आत्मदानी, प्रचंड साहसाचे धनी व प्राणवान माणसे हवीत. त्यांना कोठून शोधून आणावे ? त्यांच्यात कोण प्राण संचारित करील ? त्यांना "करू अथवा मरू"च्या दृढ संकल्पांनी कोण ओतप्रोत करील ? चहुकडे दृष्टिक्षेप केल्यानंतर एकच उपाय सुचतो की– "शोधाची सुरुवात आपल्या घरापासूनच केली पाहिजे." विश्वामित्राने याचना करताच दशरथ राजाने स्वतःचीच मुले त्यांच्या स्वाधीन केली होती. गुरू गोविंद सिंगांचे पाचही पुत्र अग्रगामी बनले होते. राजा हरिश्चंद्राने स्वतःच गुरूची आवश्यकता पूर्ण केली होती. ही परंपरा आज पुन्हा जागृत करण्याची निकड भासत आहे. स्वतःचे उदाहरण प्रस्तुत करूनच इतरांना आदर्शवाद अंगीकारण्यासाठी प्रोत्साहित केले जाऊ शकते.

## प्रयोगाचा शुभारंभ आणि विस्तार

या तथ्यास युग निर्माण योजना मिशनचे संस्थापक परम पूज्य आचार्य पं. श्रीराम शर्मा यांनी अंगीकारून नवनिर्मितीचा श्रीगणेश केला. वडिलोपार्जित संपत्तीचा एक-एक पैसा जनता जर्नादनास अर्पण करीत



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

त्यांनी इतरांनाही प्रोत्साहित केले की त्यांनी देखील लोभ, मोह आणि अहंकाराची बंधने शिथिल करून जो वेळ, परिश्रम, कौशल्य, प्रतिभा, पैसा व बुद्धी वाचेल, ती जन कल्याणासाठी अत्यावश्यक असलेल्या विचारक्रांतीसाठी शक्य तेवढी नियोजित करावी.

वयाच्या १५ व्या वर्षापासून तो ८० व्या वर्षा पर्यंत त्यांनी हेच काम केले. आपला आदर्श समोर ठेवीत, संपर्क क्षेत्रातील प्रत्येक स्वजनास अपेक्षेपेक्षा जास्त उत्कृष्टता अंगीकारून आदर्शवादी मार्गावर चालण्यासाठी प्रोत्साहित-उत्साहित केले आहे. हे कार्य त्यांनी एक गुरूजी म्हणून केले आहे. हिंदी भाषेतील 'अखंड ज्योति' व 'युग निर्माण योजना' मासिके तसेच सात इतर भाषांमध्ये छापल्या जाणाऱ्या मासिकांद्वारे त्यांनी नुसती वाचन सामग्रीच दिली नाही, तर वाचकांच्या अंत:करणास एवढ्या प्रमाणात हलवून जागे केले की त्यांनी युग समस्यांशी दोन-दोन हात करण्यासाठी आपले सहयोग, सहकार्य कोणत्या ना कोणत्या रूपात प्रस्तुत करायला तत्पर व्हावे. आजमितीस त्यांच्याद्वारे संपादित, प्रकाशित मासिकांची संख्या लाखोंच्या घरात आहे. प्रत्येक अंक किमान पाच व्यक्ती तरी निश्चितच वाचतात. म्हणून त्यांच्यापासून लाभान्वित होणाऱ्यांची, मिशन सोबत आत्मीयता प्रस्थापित करणाऱ्यांची संख्या खूपच मोठी होते. याच जनशक्तीच्या माध्यमातून विचारक्रांतीच्या शुभारंभापासून तो एकविसाव्या शतकाच्या गंगावतरणा पर्यंतच्या विशाल योजना तयार करून त्या सक्रिय क्रियान्वयनाच्या स्थितीपर्यंत पोहचून दिल्या गेल्या आहेत.

एकाचे पाच व पाचाचे पंचवीस असे आपले विस्तार तंत्र आहे. पाच लाख स्थायी सदस्यांचे पंचवीस लाख वाचक आहेत. या पैकी प्रत्येकावर स्वत:चे पाच-पाच सहयोगी तयार करण्याची जबाबदारी सोपविली आहे. अशा प्रकारे हा उपक्रम दुसऱ्या झेपेतच सुमारे एक कोटी प्राणवानांना व सृजन शिल्पींना (नव निर्मात्यांना) एकत्रित करण्याच्या शक्यतांनी परिपूर्ण आहे, सक्षम आहे. हा उपक्रम पुढे वाढत-वाढत जगाच्या ६५० कोटी मानवांना आपल्या सशक्त हातांनी घट्ट पकडून ठेवील तर



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

आश्चर्य वाटायला नको, तसेच या अपेक्षे प्रती अमास्था सुद्धा व्यक्त करता कामा नये. याचा मत्स्यावताराप्रमाणे वाढणारा विस्तार जर युग परिवर्तनाचे वातावरण विनिर्मित करील तर त्यात नवल ते काय !

## प्रखर प्रेरणेचे प्राणवान तंत्र

समाज प्रबोधनासाठी सशक्त लेखणी व वाणीची आवश्यकता तर आहेच पण त्या सोबतच असे व्यक्तिमत्त्व देखील हवे जे आपले स्वत:चे उदाहरण प्रत्यक्ष दाखवून, इतरांना युगानुरूप आपल्या विचार व कार्यांमध्ये आवश्यक फेरबदल करण्यासाठी प्रेरित व प्रवृत्त करू शकेल. ही तिन्ही कार्ये मिशनच्या सूत्र संचालकांनी आपल्या समर्थ जीवनकाळात पूर्णपणे संपन्न केलीत. वेळ, परिश्रम आणि बुद्धीचा एक अंश सुद्धा निर्धारित उद्दिष्टाव्यतिरिक्त अन्य कुठल्याच कामी खर्च केला नाही.

प्रत्यक्षात दिसूनच येते की, जवळ जवळ सर्व आर्षग्रंथांचे संस्कृतचे हिंदी भाषांतर आचार्यजींनी केले आहे. त्यांनी चार वेद, १०८ उपनिषदे, षड् दर्शने, चोवीस गीता, स्मृती, ब्राह्मण, आरण्यकादि ग्रंथांचे अध्ययन, भाषांतर करून त्यांना सर्व सामान्य जनांपर्यंत पोहचविण्याचा अथक व यशस्वी प्रयास केला आहे. सुमारे ३५०० पुस्तके अशी लिहिली आहेत, जी व्यावहारिक जीवनात आध्यात्मिक सिद्धांतांच्या समावेशाचे सरळ-सोपे व अनुभवसंपन्न मार्गदर्शन करतात. आठ प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या मासिकांविषयी या अगोदर सांगितलेच आहे. या साहित्याचे भाषांतर व प्रकाशन झाले आहे ते वेगळेच. बाजार भावाने साहित्य खरेदी करणे सर्व सामान्य लोकांच्या आवाक्या बाहेरचे असते. म्हणूनच जवळ-जवळ मूळ खर्चा एवढ्याच किंमतीवर त्याचे प्रकाशन व पिशवी पुस्तकालये तसेच ज्ञान रथांच्या माध्यमातून त्यास घरोघरी पोहचविण्याचा जीवतोड आटापिटा म्हणजे एक आगळा-वेगळा उपक्रम आहे. प्राणवान परिजन घरोघरी जाऊन शिकलेल्यांना युग साहित्य मोफत वाचायला देतात व वाचून झाल्यावर परत घेतात. अशिक्षितांना ते वाचून दाखवितात. या दरम्यान काही साहित्य विकले पण जाते व हळूहळू घरगुती पुस्तकालय



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

बनविण्याची प्रदीर्घ शृंखला पुढे सुरू राहते.

जनमानस परिशुद्धीसाठी आवश्यक ती विचारक्रांती संपन्न करण्याकरिता दुसरा उपाय आहे- वाणी अर्थात् संगीत व प्रवचन. या साठी शांतिकुंज मध्ये अशी प्रशिक्षण सत्र शृंखला निरंतर सुरू असते. प्रत्येक सत्रात हजारो लोक येतात व वरील दोन्ही कला शिकून जातात. त्यांना हे खास करून शिकविले जाते की पडलेल्यांना उठून उभे करण्याची जबाबदारी पत्करणाऱ्याने अपेक्षेपेक्षा अधिक उजळ व साहसी असायला हवे. मार्गदर्शकाचे स्वतःचे व्यक्तित्व हे लेखणी व वाणी पेक्षा अधिक समर्थ व प्रभावशाली असते. जर ते मरगळलेले व निकृष्ट असेल तर निर्धारित उद्दिष्ट पूर्ण होण्याऐवजी उपहासपात्र होते व ते केवळ हलके फुलके मनोरंजन तेवढे करू शकते. सूत्र संचालकांकडून मिळालेल्या प्रेरणेमुळेच आता पावेतो या प्रशिक्षण प्रक्रियेअंतर्गत शांतिकुंजने सुमारे एक लाख युग शिल्पींना कार्यक्षेत्रात उतरविले आहे.

या कार्यकर्त्यांचे कार्यक्रम, उपक्रम योजनाबद्ध रूपात आपल्या समीपवर्ती कार्यक्षेत्रांमध्ये निरंतर सुरू राहावेत म्हणून या साठी संस्थेद्वारे ठिकठिकाणी लहान मोठे आश्रम बनवून दिले आहेत, ज्यांना 'शक्तिपीठ', 'प्रज्ञापीठ' म्हणून ओळखले जाते. यांची संख्या काही दिवसांपूर्वी अडीच हजार होती ती आता वाढत वाढत साडे तीन हजारांपर्यंत पोहचली आहे. त्या संस्था आपली व्यवस्था अंशदान व समयदान देऊन स्वतःच पूर्ण करतात व प्रचार-प्रसाराचा गाडा पुढे रेटतात.

## लोक सेवी कार्यकर्त्यांची जडण-घडण

शांतिकुंज मधून जन जागृतीसाठी प्रचार टोळ्या देशभरात पाठविल्या जातात. त्यांच्या माध्यमातून फार मोठ्या प्रमाणात उपस्थित जनतेस आपला जीवनक्रम बदलण्यासाठी मार्मिक उद्बोधन दिले जाते. आता मागणी आणि गरज अधिक वाढत आहे. तसे तर प्रशिक्षित प्रचारक प्रत्येक क्षेत्रात तयार होतात व त्या परिसरात प्रचार कार्य करतात. ते आपल्या संपर्क क्षेत्रामध्ये दररोज दोन-चार तास मनःपूर्वक जनसंपर्क



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

साधतात व उलट दिशेने वाहणाऱ्या जन प्रवाहास उलट करून योग्य त्या दिशेने प्रवाहित करण्यासाठी पूर्ण सामर्थ्यानिशी प्रयत्न करीत राहतात.

वरील प्रचार प्रक्रिये व्यतिरिक्त एक मोठी बाब म्हणजे-समर्पित कार्यकर्त्यांचे नवनिर्मितीसाठी केलेले जीवनदान. हे नियोजन अतिशय कठीण आहे, कारण सर्व सामान्यपणे प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या स्वार्थसाधनात एवढी गुरफटून गेली आहे की तिला युगक्रांती सारख्या पारमार्थिक कार्यांमध्ये अजिबात स्वारस्य नाही व वेळही नाही. कारण जिथे आवड तिथे सवड असते. प्रत्येक क्षेत्रामध्ये वेतनधारीच काम करताना आढळून येतात. परंतु जिथे भावसंवेदनामध्ये आदर्शवाद ठासून भरण्याचा प्रश्न येतो, तिथे साधु-ब्राह्मण, परिव्राजक व वानप्रस्थ या पातळीवरचे निःस्पृह कार्यकर्तेच हवेत, अन्यथा ते सर्व सामान्य लोकांची श्रद्धा व आदर्शवादी कार्यांसाठी त्यांचा सहयोग प्राप्त करू शकणार नाहीत.

हे तथ्य लक्षात घेऊन, शांतिकुंजचा अभिनव प्रयास स्वावलंबी जनसेवक तयार करण्याचा आहे. कुटुंबात राहून मेहनत करून किंवा कुटीरोद्योगांच्या माध्यमातून उदर निर्वाह करीत रहावे. कधी काळी अशी परंपरा होती की ब्राह्मण कुटुंबातील एक व्यक्ती परिव्राजक म्हणून जनकल्याणार्थ अर्पण केली जायची. क्षत्रिय, आपल्या कुटुंबातील किमान एकास तरी देश रक्षणार्थ सैनिक म्हणून द्यायचे. शिख धर्मात देखील प्रत्येक घरातून एक जण गुरू कार्यार्थ समर्पित केला जाई. या परंपरेनेच त्या कार्यक्षेत्रांना श्रेष्ठ प्रतीच्या प्रतिभा प्रदान केल्या आहेत. आता ते सर्व लुप्त झाले आहे. शांतिकुंजने वरील परंपरेस 'वानप्रस्थ परंपरेचे पुनरूज्जीवन" या रूपात सुरू केले आहे व तिचा विस्तार झपाट्याने निरंतर होत आहे.

शांतिकुंज परिसरातच हल्ली सुमारे २००० व्यक्ती निवास करतात. यातील बरेच उच्चशिक्षित आहेत, जे चांगल्या पगारांच्या नोकऱ्या व भरपूर लाभाचे उद्योगव्यवसाय सोडून समर्पित भावनेने आश्रमात आले. ते दररोज आठ-दहा तास श्रमदानी स्वयंसेवका प्रमाणे काम करतात. आश्रमातील बहुतेक सर्व कामे समर्पित समयदानी व जीवनदानी बंधु-भगिनीच करतात.



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

पगारी नोकर कांहीच सेवाकार्यांमध्ये मर्यादित स्वरूपातच आहेत. अशा प्रकारे आश्रमाची सर्व सेवाकार्ये कार्यकर्ते मिळून संपन्न करतात. ज्यांच्या कडे स्वत:ची आर्थिक तरतुद आहे, ते त्यावर उदर निर्वाह करतात. ज्यांना ते शक्य नाही, ते आश्रमाकडून ब्राह्मणोचित उपजीविका घेऊन काटकसरीचे साधे जीवन आंतरिक उल्हासाने जगताहेत. आध्यात्मिक साम्यवादाचा हा व्यावहारिक उपक्रम पाहण्या व वाखाणण्या सारखा आहे. लोक म्हणताना दिसतात की जर कोणाला व्यावहारिक साम्यवाद पाहायचा असेल तर त्याने शांतिकुंज मध्ये येऊन तो पाहावा. येथे "जाति-वंश सर्व एक समान", "नर आणि नारी एक समान" हे उद्घोष पूर्णपणे प्रत्यक्षात साकार झाल्याचे कोणीही पाहू शकेल.

एकविसाव्या शतकाच्या अनिवार्य गरजा लक्षात घेता इ.स. २००५ मध्येच असा संकल्प घेतला गेला की युगसंधीच्या या बारा वर्षांमध्ये एक लाख समाज सेवक प्रशिक्षित करून विभिन्न प्रयोजनांशी संबंधित कार्यक्षेत्रांमध्ये नियोजित केले जावेत. या साठी निवासस्थानांची आवश्यकता लक्षात घेऊन, भवन निर्माण योजना युद्ध पातळीवर सुरू आहे. अशी आशा बाळगायला हरकत नाही की येत्या काही दिवसातच हाच आश्रम जवळ जवळ दुप्पट आकाराचा बनेल.

शांतिकुंजची अर्थ व्यवस्था शांतिकुंजशी आत्मीयतेच्या धाग्यांनी जुळलेल्या अनुयायांच्या ऐच्छिक सहयोग दानातून पूर्ण होत आहे. मिशनशी एकरूप झालेले परिजन स्वत:हून यथाशक्ती, श्रद्धापूर्वक जे आर्थिक अंशदान पाठवितात, त्याद्वारेच काटकसरपूर्वक सर्व खर्च भागविले जातात. या ऐच्छिक सहयोग्यांमध्ये अधिकांश असे आहेत, जे दररोज केवळ एक रुपयाचे दान देतात. आचार्य विनोबांचे असे मत होते की कोणत्याही संस्थेने तोपर्यंत जिवंत राहावे, जोपर्यंत तिची उपयुक्तता अनुभवणारे तिला अंत:प्रेरणेने खत-पाणी देत राहतील. याच आदर्शाचे पालन करीत शांतिकुंजने आतापर्यंतचे अभिनव कार्ये संपन्न केली व भविष्यातील विराट योजना देखील याच आधारे पूर्ण होतील.



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

## विज्ञान व अध्यात्माचा समन्वय

शांतिकुंजच्या उपक्रमांमधील एक मोठा व महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे अध्यात्माचे विज्ञानाच्या आधारे नव्याने प्रतिपादन. आजपर्यंत शास्त्र उल्लेख व आप्तवचनच आध्यात्मिक सिद्धांतांचे प्रतिपादन करीत असत, परंतु हल्लीच्या काळात बुद्धिवादास प्राधान्य मिळू लागल्यामुळे तर्क, तथ्य, प्रमाण, उदाहरण इत्यादींची अपेक्षा केली जात आहे. शांतिकुंजच्या ब्रह्मवर्चस आश्रमाची स्थापना या साठीच करण्यात आली आहे. त्यातील प्रयोगशाळेत अत्याधुनिक यंत्र सामग्री व आवश्यक त्या सर्वच महत्त्वपूर्ण पुस्तकांचा संग्रह करण्यात आला आहे. त्यांच्या माध्यमातून संपन्न होणारे शोधकार्य नव्यापिढीच्या दृष्टीने आदर्शवादी तत्त्वज्ञानास प्रामाणिक सिद्ध करू शकेल.

ब्रह्मवर्चस शोध संस्थेमध्ये जडी-बूटी विज्ञानाच्या संशोधन कार्याचा एक असा विभाग सुरू करण्यात आला आहे की ज्याला आयुर्वेदाचा जीर्णोद्धार सुद्धा म्हणता येईल.

या संशोधन कार्यामध्ये संबंधित विषयांचे तज्ज्ञ आणि पोस्ट ग्रॅज्युएट दर्जाचे कितीतरी कार्यकर्ते शोध व प्रयोग कार्यात व्यस्त असतात. या प्रयोग शाळेत एक विभाग आणखी संलग्न करण्यात आला आहे की ज्याच्या द्वारे मनुष्याच्या शारीरिक आणि मानसिक जीवनशक्तीचे नीट आकलन करता येऊ शकेल व त्याचा उपयोग उच्चस्तरीय कार्यांमध्ये करण्यासाठी मार्गदर्शन करता येणे शक्य होईल.

## घरोघरी जागृतीची हाक व प्रेरणादायी दीपयज्ञ

मिशनचे कार्यक्षेत्र अमर्याद आहे. तेव्हा अभीष्ट उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी देश-विदेशां मधील शहरे, मोठी गावे, खेडी, प्रत्येक मोहल्ला व घर यांना कार्यक्षेत्र मानून तिथे पोहचण्याचे नानाविध उपक्रम निश्चित करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्राणपणाने संलग्न व्हावे लागेल. संपर्क साधण्यासाठी सर्व सामान्य जनतेस एकत्रित करता यावे म्हणून लहान मोठी संमेलने आयोजित करावी लागतील. त्याच बरोबर हे ध्यानात ठेवावे लागेल की जमणारी मंडळी ही भावनाशील, श्रद्धाळू व उदार स्वभावाची



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

असावी. अशा संमेलनांची व कार्यक्रमांची आवश्यकता गांवागांवात व प्रत्येक मोहल्ल्यात भासेल, ज्या योगे प्रत्येक भागात नव युगाचा, नव जागृती व नव परिवर्तनाचा संदेश सहज व चांगल्या प्रकारे पोहचविणे शक्य होईल.

आजकाल सभा, संमेलने व समारंभामध्ये लोकांची अरुची वाढल्यामुळे मोठ्या संख्येत लोकांना एकत्रित करणे कठीण झाले आहे. त्यातल्या त्यात श्रद्धावान व सुशिक्षितांना एकत्र आणणे म्हणजे महादुष्कर कार्य. या समस्येवर एक अगदी नवा उपाय शोधून काढला आहे व तो आहे दीपयज्ञांचे आयोजन. जुन्या विधि-विधानानुसार यज्ञ कार्यात खूप पैसा खर्च होतो, मोठ्या प्रमाणात विविध खाद्य पदार्थ व धान्याची आवश्यकता भासते. भरपूर कालापव्ययही होतो. पुरोहितांचे कथनच ब्रह्मवाक्य मानून स्वीकारावे लागते. अशा यज्ञ कार्यात अश्रद्धेमुळे पुष्कळ लोक येतच नाहीत व आलेले टिकून राहत नाहीत. आयोजन कर्त्यांवर अनेक आक्षेप-आरोप लावले जातात परिणामी संघटने ऐवजी विघटन होऊ लागते.

वरील अडचणी लक्षात घेऊन युग धर्मानुकूल 'दीपयज्ञ' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ती व्यापक, विस्तृत, सुलभ व स्वल्प साधनांनी पूर्ण होणारी असल्याकारणें त्या सर्व उद्देशांमध्ये सफल झाली आहे, ज्या निमित्त प्राचीन काळी यज्ञ केले जात असत.

प्रत्येक याजक (यज्ञकर्ता) आपल्या पूजेच्या तबकात पाच अगरबत्त्या व एक दीपक घेऊन येतो. सर्व स्तरातील स्त्री-पुरुष रांगेत बसतात. सामूहिक गायत्री मंत्रोच्चारण होते. सोबतच गीत व प्रवचनाच्या माध्यमातून सांगितले जाते की लोकांनी प्रगतिपथावर कशा प्रकारे पाऊले टाकली पाहिजेत. तसेच रूळलेल्या प्रथा-परंपरा, रीतिरिवाजां पैकी कोणत्या बाबींमध्ये कोणती सुधारणा केली पाहिजे. शेवटी उपस्थितांमधील अध्यात्म प्रेमी, सेवाभावी व मानवतावादी धर्म प्रेमींचे एक 'प्रज्ञा मंडळ' बनवून दिले जाते.

प्रात:काळी यज्ञ, दुपारी विचार विनिमय सभा व सायंकाळी सभा-संमेलनाच्या अभिनव प्रणालीने जनजागृतीच्या क्षेत्रात असामान्य कार्य केले आहे. तसेच सर्वांगीण प्रगतीचे उत्साहवर्धक वातावरण सुद्धा विनिर्मित केले आहे. पुढे याच प्रक्रियेचा अवलंब करून प्रत्येक शहर व


Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

प्रत्येक खेड्यामध्ये पोहचून प्रत्येक व्यक्तीशी संपर्क साधण्याचा निश्चय करण्यात आला आहे. दर वर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम, समारंभ कार्यकर्त्यांच्या माध्यमातून हजारोंच्या संख्येत संपन्न होत असतात. त्यामुळे लक्षावधी व्यक्तींची मने प्रगतिशीलतेशी जोडण्याची संधी मिळते. युगसंधीच्या या १२ वर्षांमध्ये या दीपयज्ञ प्रक्रियेस देश विदेशांमध्ये अधिक व्यापक बनविण्याची योजना आहे.

## संधिकाळ व एकविसाव्या शतकातील अवतरण

विसाव्या शतकाचा शेवट आणि एकविसाव्या शतकाच्या आरंभाचे मध्यवर्ती अंतर (काळ) बारा वर्षांचे मानले गेले आहे. इ.स. १९८९ ते २००० पर्यंतच्या कालखंडास युग संधिकाळ मानले आहे. रात्रीचा शेवट व अरुणोदय काळ जेव्हा मिळतात, त्या काळास संधीकाळ म्हटले जाते. या संधिकाळाचे अनन्य साधारण महत्त्व असते. या वेळी पक्षी किळबिल करतात, फुले उमलतात आणि सर्व प्राणी आळस झटकून आपापल्या कार्यात उल्हास व उत्साह पूर्वक संलग्न होतात. उपासनादी कृत्यांसाठी देखील हाच उपयुक्त काळ मानला जातो. निश्चित जाणावे की ही युगसंधीची बारा वर्षे अत्यंत महत्त्वपूर्ण संभावनांनी परिपूर्ण असतील. या काळात गेल्या तीनशे वर्षा पासून चालत आलेल्या अवांछनीय बाबींचे प्रायश्चित्त होईल व सुखद शक्यतांनी ओतप्रोत असलेल्या एकविसाव्या शतकाचे बीजारोपण होईल. वाईट बाबींचा शेवट आणि सत्यं, शिवं, सुंदरम्चे संवर्धन व विकास ही दुहेरी प्रक्रिया याच काळात खूप द्रुतगतीने संपन्न होण्यास सुरुवात होईल.

घड्याळाचा लंबक विशिष्ट सीमेपर्यंतच पुढे जातो, शेवटी त्यास परत आपल्या स्थानी यावेच लागते. निसर्गाचा नियम असा आहे की, तो कोणाचाच अतिरेक सहन करीत नाही. सृष्टीने नियंत्रण व संतुलनाचा नियम देखील बनविला आहे. गेल्या तीनशे वर्षांमध्ये मानवाने प्रत्येक क्षेत्रात मनमानी व आडमुठेपणा केला आहे तेव्हा त्याचे कटूफळ हे मिळणारच. विधात्यास ही गोष्ट मुळीच आवडत नाही की, अतिशहाण्या



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

उन्मत्तांनी पृथ्वीला विनाशाच्या गर्तेमधे लोटावे, त्यास हे देखिल अभीष्ट नाही की, मनुष्याने आपल्या गौरवशाली महानतेचा, माणुसकीचा त्याग करून नरपशू वा नरपिशाच्चा प्रमाणे आचरण करून नियंत्यास कलंकित करावे. असंतुलन विनाशाचे बीज पेरत असते. म्हणूनच निसर्ग वेळीच अनर्थ रोखतो व शाश्वत सौजन्यास त्याच्या निर्धारित स्थानी विराजमान करतो.

आतापर्यंत सर्वत्र साचलेल्या घाणीची या एकविसाव्या शतकात साफ-सफाई केली जाणार आहे. चक्रीवादळ हे केरकचऱ्यास कुठल्या कुठे उडवून देणार आहे की जेणेकरून सौंदर्य व सुव्यवस्था यथास्थानी कायम टिकून राहावी. दिव्यदृष्टीसंपन्न महात्मे हे स्पष्ट पाहत व अनुभवीत आहेत की विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत वाईट दुष्टवृत्ती व अमंगल तत्त्वे आपला पसारा आवरून पलायन करतील व त्याचवेळी एकविसावे शतक हे उज्ज्वल भविष्यास आपल्या पदरी बांधून स्वर्गातून पृथ्वीवर पदार्पण करील.

## भावी संभावना-भविष्य कथन

एकविसावे शतक हे उज्ज्वल भविष्याच्या संभावनांनी भरलेले आहे. या शतकात समता व एकतेचे प्रभुत्व असेल. अशी स्फुरणा मुळातच चैतन्य संपन्न अशा व्यक्तित्वांच्या अंतःकरणात प्रकट होत आली आहे. काही जगप्रसिद्ध भविष्यवक्ते जगातील विभिन्न भागांमध्ये झाले आहेत ज्यांनी विश्व समस्या आणि त्यांच्या परिवर्तनांविषयी बरेच काही सांगितले आहे व ते काळाच्या कसोटीवर जवळ जवळ सर्व सत्य सिद्ध होत आले आहे. सुमारे साडे चारशे वर्षांपूर्वी फ्रांसमध्ये एक नोस्ट्रॉडेमस नावाची व्यक्ती होऊन गेली. त्या दिव्य द्रष्ट्याने आतापर्यंत घडलेल्या जागतिक घटनांच्या संदर्भात बरेच काही सांगितले आहे व त्यांचे ते भविष्य कथन प्रत्येक कसोटीवर सत्य सिद्ध झाले आहे. त्यांनी इ. स. २००० नंतर येणाऱ्या काळास "एज ऑफ ट्रूथ" या नावाने संबोधिले आहे व या नव निर्मिती मध्ये भारताची प्रमुख भूमिका असण्याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या पुस्तकावर विस्तृत भाष्य करते वेळी जॉन हॉग नावाच्या तत्त्ववेत्त्याने एक नवीन ग्रंथ लिहिला आहे- "नोस्ट्राडेमस अँड दि मिलेनियम". त्या



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

ग्रंथात भारता विषयीच्या त्यांच्या कथनाचा अभिप्राय विशद करताना म्हटले आहे की एका नवचेतनेचा उद्भव इ. स. १९९० पासून होणे प्रारंभ होईल व ती संपूर्ण विश्वाला प्रभावित करील; त्या नवचेतनेचा उदय भारतातूनच होईल.

डॉ. मार्गारिट मीड, हरमन कॉन, पीटर हरकोस, विलियम या सारख्या विश्वविख्यात भविष्य वक्त्यांनी सुद्धा अशाच संभावना घोषित केल्या आहेत की एकविसाव्या शतकात सर्व मानवी समस्यांचे समाधान होईल व अशा परंपरांचे प्रचलन सुरू होईल की ज्यायोगे प्रगती व शांतीचा भक्कम पाया तयार होईल. प्रो.हरार सुद्धा या विषयाचे विशेषज्ञ मानले जातात. त्यांनी म्हटले आहे- "भारत एका विराट शक्तीच्या रूपात पुढे येईल व त्यास नव निर्मितीच्या क्षेत्रात अनेक देशांचे व विशेषज्ञांचे समर्थन प्राप्त होईल. जीन डिक्सनच्या "माय लाइफ अँड प्रोफसीज" नामक ग्रंथात लिहिले आहे- "विसाव्या शतकाच्या शेवटच्या बारा वर्षांमध्ये पाश्चात्य सभ्यता भोगवाद सोडून पौर्वात्य सभ्यतेस शरण येईल. नीतिमत्तेचा, नैतिक मूल्यांचा विजय होईल. विश्व शांती प्रस्थापित करण्यात भारताची विशेष भूमिका राहील." प्रो. कीरोंनी सुद्धा अगदी याच प्रकारचे अभिमत व्यक्त केले आहे.

महान तत्त्वचिंतक हक्सले कामा यांनी आपल्या 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' या पुस्तकात लिहिले आहे की, मागील सर्व क्रांत्यापेक्षा श्रेष्ठ अशी एकता व समता प्रस्थापित करणारी "विश्व क्रांती" झपाट्याने साकार होत आहे. हिची लक्षणे विसाव्या शतकाच्या अंतिम बारा वर्षांमध्ये प्रत्यक्षात अवतरित असल्याचे स्पष्ट दिसू लागेल. "इस्लाम भविष्याच्या आशा" पुस्तकात सैयद कुत्ब यांनी लिहिले आहे की एकविसाव्या शतकाचा प्रारंभ धर्म आणि विज्ञानाच्या समन्वयाने होईल. महर्षी श्री अरविंदांच्या मतानुसार इ. स. २००० पूर्वीच आत्मबल संपन्न प्रतिभा मधील सर्वोत्कृष्ट (सुपर) चेतनेचे अवतरण होईल, जी व्यक्तीच्या विचारांमध्ये कमालीचे परिवर्तन घडवून आणेल. स्वामी विवेकानंदांनी इ. सन १८९७ मध्ये एका भाषणात म्हटले होते की भारताचे प्रज्ञावंत पुढे येतील व ते एकता-समता युक्त विश्व संस्कृतीस-भारतीय संस्कृतीस संपूर्ण जगात पसरवतील.

संपूर्ण जगभर वाचल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित नियतकालिक 'टाईम'



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

मध्ये लिहिले आहे– " भविष्य काळास उज्ज्वल बनविणारे प्रयत्न आता वेगात सुरू झाले आहेत." याच मासिकाचा २ एप्रिल १९८९ चा अंक पूर्णपणे भारतास समर्पित केला आहे. त्यात लिहिले आहे "एक नवे नेतृत्व भारताच्या रूपाने पुढे येत आहे. भारत आपला आध्यात्मिक वारसा, युवा शक्ती, बुद्धिजीवी व प्रतिभावंताच्या विपुल संख्येच्या आधारे येणाऱ्या काळात जगाचे नेतृत्व करील." वाशिंग्टन पोस्ट मध्ये प्रकाशित झालेल्या एका सर्वेक्षणा नुसार, "सूर्यामध्ये अलीकडे अनन्य साधारण असे परिवर्तन व घडामोडी होत आहेत. त्यांचा प्रभाव १८८९ पर्यंत प्रकर्षाने विलक्षण स्वरूपात प्रगट होत असल्याचे दिसून येईल. अन्य प्रभावांव्यतिरिक्त वरील प्रभाव भारतास सर्वोच्च शिखरावर नेत असल्याचे दिसून येईल." अशाच प्रकारे अन्य विशेषज्ञांच्या मतानुसार विध्वंस थांबल्याने आणि विकास पराकोटीला पोहचण्याने जगात सुखद परिस्थिती उत्पन्न होण्याचा उल्लेख जागो जागी आढळतो.

ज्यावेळी इंग्लंडवर जर्मनीच्या विमानांद्वारे एक सारखा बॉम्ब वर्षाव होत होता व त्यामुळे झालेल्या विध्वंसाकडे पाहिले असता सर्वत्र बेचैनी व निराशा पसरली होती. त्यावेळी इंग्लंडचे पंतप्रधान 'चर्चिल' होते. त्यांनी निराशेच्या वातावरणात एक नवा संदेश दिला व तो देशाच्या कानाकोपऱ्यात लिहिण्यात आला. संदेश होता– "व्ही फॉर व्हिक्ट्री", याचा उद्देश होता की शेवटी इंग्लंड विजयी होईलच. विजय आमचाच निश्चित होईल. या उद्घोषाने त्या देशातील नागरिक व सैनिकांमध्ये एक अभूतपूर्व उत्साह व दांडगा आत्मविश्वास उत्पन्न झाला. परिणामी लोक पलायनाचा, निराशेचा विचार झटकून कठीण परिस्थितीशी व संकटांशी दोन हात करण्यासाठी एकजूट झाले आणि शेवटी विजय मित्र राष्ट्रांचाच झाला.

गेल्या तीनशे वर्षांमध्ये शक्तीच्या अतोनात दुरुपयोगास लक्षात घेता, आज देखील प्रत्येकाच्या मनात भावी विनाश व संकटांसंबंधि अनेक तऱ्हेच्या शंका-कुशंका व दुःखद दुष्परिणामांच्या कल्पना दृढमूल होत आहेत. मनोबल खच्ची होण्याचे दुष्परिणाम सर्वविदित आहेत. ही भयावह



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

स्थिती लक्षात घेता आज सृजनात्मक नवा उत्साह उत्पन्न करण्याची व नव निर्मितीसाठी एकजूट होऊन वातावरण विनिर्मित करण्याची नितांत गरज आहे. या दृष्टीने देखील "एकविसावे शतक उज्ज्वल भविष्य" या उद्घोषास अधिकाधिक व्यापक बनविण्याची आवश्यकता आहे. याच उद्दिष्टपूर्तीसाठी शांतिकुंजद्वारे जे वातावरण तयार केले जात आहे, त्याची महती समजून घेतली पाहिजे. मोठ्या आत्मविश्वासाने अशा प्रयत्नांना चालना दिली पाहिजे, हिरीरीने सहकार्य केले पाहिजे ज्या योगे गत काळात झालेल्या हानींची क्षती पूर्ती पुढील काही दिवसात करण्यास समर्थ होता येईल.

## एकविसाव्या शतकाची आध्यात्मिक गंगोत्री

शांतिकुंज मध्ये युगसंधी महापुरश्चरण आरंभ करण्याचा संकेत प्राप्त झाला आहे. हे बारा वर्षे चालेल. बारा वर्षांचे एक युग असते. सूक्ष्म जगतामध्ये बारा वर्षांच्या अंतराने काही महत्त्वपूर्ण परिवर्तनेही होत असतात. कित्येक तप-साधनांचे विधान बारा वर्षांमध्ये पूर्ण होते. युगसंधी पण बारा वर्षांची आहे. या युगसंधीच्या काळात शांतिकुंजद्वारे एक व्यापक धर्मानुष्ठान सुरू झाले आहे. त्या सोबतच कित्येक सृजनात्मक, सुधारणात्मक उपक्रमांचा क्रांतिकारी शुभारंभ पुरेपूर शक्तीचे नियोजन करून केला आहे.

नऊ दिवसांची व एक महिन्याची सत्र शृंखला शांतिकुंजच्या पावन भूमीत सुनियोजित स्वरूपात सुरू आहे. या सत्रांमध्ये साधनात्मक तपश्चर्येचा समावेश आहे व त्या सोबतच प्रतिभा परिशोधनाचे प्रशिक्षण व प्रेरणा प्रवाहाचा अनुपम समन्वय देखील आहे. प्रत्येक महिन्यात एक मासीय सत्र सुरू असते. ज्यांच्याकडे कमी वेळ आहे ते नऊ दिवसातही ही प्रक्रिया पूर्ण करून घेतात. ही दोन्ही सत्रे साधना प्रधान आहेत. यामधे शिक्षणाची अशी व्यवस्था आहे, जी व्यक्तित्वास उजळून टाकण्याच्या व प्रतिभेस विशुद्ध व प्रखर बनविण्याच्या प्रयोजनास पूर्ण करू शकेल.

साधना बारा वर्षांची असल्यामुळे साधक वरील सत्रांमध्ये तिचा शुभारंभ केल्यानंतर आपापल्या घरी, गावी व परिसरामध्ये शक्य असेल त्या प्रमाणे साप्ताहिक सत्संगाच्या रूपात सामुहिक उपासनेचा उपक्रम



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

सुरू ठेवतात. त्या सत्संगांमध्ये अधिकाधिक व्यक्तींना निमंत्रित व सहभागी करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे हा उपक्रम दिवसेंदिवस अधिकाधिक व्यापक होत आहे. लक्षावधी लोकसेवक या उपक्रमामध्ये येत्या काही दिवसातच सक्रिय झालेले दिसून येतील.

प्राचीन काळात जनमानसात उत्कृष्टता टिकून राहावी म्हणून वानप्रस्थ परंपरेचे प्रचलन होते. त्यामुळे जन कल्याणकारी सेवकांची कुठेच उणीव भासत नव्हती. मग आज सुद्धा जनकल्याण कार्यात रममाण होण्याची महत्त्वाकांक्षा असंख्य उदार आत्म्यांमध्ये उत्पन्न केली जाऊ शकते. गौतम बुद्ध व महात्मा गांधीजींच्या आंदोलनांमध्ये सहभागी होणाऱ्यांची संख्या सहजच लाखांवर गेली होती. मग आता तशीच परंपरा काळाची गरज पूर्ण करण्यासाठी चालू राहू शकणार नाही असे म्हणता येणार नाही, विशेषत: अशा वेळी जेव्हा अदृश्य जगतातून प्रस्फुटित होणाऱ्या दैवी प्रवाहाचे त्यामध्ये सहयोग-सहकार्य संलग्न होत आहे. एकटा भगीरथ जर गंगेचे अवतरण स्वर्गातून धरतीवर करू शकतो, अनेक प्रतिभासंपन्न व्यक्तींचे कौशल्य व पुरुषार्थाची जिद्द प्रत्येक क्षेत्रात आपला चमत्कार दाखवू शकते, मग नवनिर्मितीसाठी युगशिल्पी निर्माण करण्याची ईश्वरी इच्छा पूर्ण होणे कां शक्य होणार नाही ? वेळ येताच वसंत ऋतूतील फुलांप्रमाणे प्रतिभासंपन्न व्यक्ती पुण्य कार्यासाठी स्वत:च पुढे येऊन अधिक प्रखर व कुशल बनल्याचे दिसून येईल.

एकविसाव्या शतकाला देखील दुसरे गंगावतरणच म्हटले जाऊ शकते. याचा उगम शोधायचा असेल तर गंगोत्रीची उपमा शांतिकुंजला देता येईल. यमुनोत्रीहून यमुना निघते. अमरकंटक पर्वतातून नर्मदा तर मानसरोवरातून ब्रह्मपुत्रा उगम पावते. नंतर त्यांचा विस्तार व प्रवाह हळूहळू वाढतच गेला आहे. एकविसावे शतक अर्थात उज्ज्वल भविष्याचा उद्घोष ज्या पांचजन्याद्वारे अंतरिक्षास गुंजायमान करू लागला आहे, त्यास शांतिकुंज म्हटल्यास वावगे होणार नाही. गंगेची कूस, हिमालयाची छाया, सप्तऋषींच्या तपस्थली व्यतिरिक्त या भूमीस दिव्य साधना व यज्ञकृत्यांनी पवित्र व



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

सशक्त बनविण्यात आले आहे. दिव्य संरक्षण आणि दिव्य वातावरणाची देखील येथे उणीव नाही. अशाच अनेक कारणांमुळे दैवी चेतनेने जर या आश्रमास युग अवतरणासाठी भगीरथ प्रयत्न करण्याची जबाबदारी सोपविली आहे तर ते उचितच आहे.

अत्यंत कार्यव्यस्त किंवा असमर्थ लोकांसाठी एक प्रतीक साधना देखील नियोजित करण्यात आली आहे. सकाळी जागे होताच पाच मिनिटांच्या या मानसिक ध्यान धारणेस संपन्न केले जाऊ शकते.

आपल्या जागे वरून ध्यानातच हरिद्वारला पोहचावे. गंगेत बुडी मारावी व शांतिकुंज मध्ये प्रवेश करावा. गायत्री मंदिर व यज्ञ शाळेला प्रदक्षिणा घालावी. अखंड दीपका जवळ जावे व तिथे बसून कमीत कमी १० वेळा गायत्री मंत्र जप करावा. माताजी कडून भक्तीचे व गुरुदेवांकडून शक्तीचे अनुदान आशिर्वाद घेऊन आपल्या स्थानी परत यावे. या प्रक्रियेस सुमारे ५ मिनिटे लागतात पण एवढे केल्यानेच महापुरश्चरणातील अल्पसा सहभाग साधला जातो. ज्यांच्याकडे थोडा अधिक वेळ आहे, त्यांनी गायत्री मंत्र जप व सूर्याचे ध्यान सोईनुसार जास्त वेळ करावे.

हे उपक्रम इ.स. २००० च्या अंतापर्यंत चालले. या महापुरश्चरणाची पूर्णाहुती एकविसाव्या शतकारंभी इ.स. २००० मध्ये झाली. या पुण्य कार्यात एक कोटी साधकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भाग घेतला. अधिक व्यक्तींचे एकनिष्ठ होऊन एक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी जेव्हा एकत्रीकरण होते तेव्हा एक प्रचंड शक्ती उत्पन्न होते. या पूर्णाहुतीचे फळ देखील असामान्य व चमत्कृती युक्तच असते. नवनिर्मितीचे अनेक निर्झर त्यामधून प्रस्फुटित होतील. परिणामी अनेक कार्यक्रम, उपक्रम पुरेपूर सामर्थ्यानिशी उसळी घेतील.

## या पूर्णाहुतीचे सत्परिणाम

इ.स. १९५८ मध्ये गायत्री तपोभूमीच्या तत्त्वावधानात एक सहस्र कुंडी गायत्री महायज्ञ संपन्न झाला होता. या महायज्ञात चार लक्ष साधक आले होते. दर्शकांची संख्या सुमारे पंधरा लक्ष होती. या साधकांच्या सहमतीने सुमारे सहा हजार शाखांची संघटना उभारण्यात आली व भारताच्या



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

देवभूमीतील देव संस्कृतीस नवजीवन प्रदान करण्याचा सर्वांनी संकल्प घेतला होता. गेल्या तीस वर्षांमध्ये जी काही महत्त्वपूर्ण सृजन कार्ये संपन्न झालीत, ती त्याच महायज्ञाची फलश्रुती आहे. इ.स. २००० मध्ये जी एक कोटी व्रतशील साधकांद्वारे पूर्णाहुती झाली, तिचा प्रभाव पुढे पुरेपूर शंभर वर्षांपर्यंत आपल्या शक्तीचा परिचय देत राहील आणि युग परिवर्तनाच्या प्रतिक्रियेस काल्पनिक नव्हे, तर सर्वस्वी सार्थक करीत आहे. या धर्मानुष्ठानामध्ये उपस्थित जनांमधील प्रत्येकास नवनिर्मितीची अशी कामे सोपविली जे ते आपल्या योग्यता व परिस्थितीनुरूप पूर्ण करू शकतील.

या अवधीत एक लक्ष समाज सेवक विनिर्मित व प्रशिक्षित करण्याची बाब कठीण व अशक्य वाटत असली तरी त्यासाठी वादळी आंदोलन निर्माण करता आले व ते प्रचलित करण्यासाठी तसाच दमदार प्रवाह उत्पन्न करता आला, एकाचे पाहून दुसरी व्यक्ती देखील चांगल्या बाबी, परंपरा सुद्धा अंगीकारू शकतो. जगात अशी एक देखील व्यक्ती नाही की जी अंत:करण पूर्वक इच्छा केली तर उदर निर्वाहानंतर जन कल्याणाचे कोणते ना कोणते काम करू शकणार नाही. बिहार मधील 'हजारी' नांवाच्या शेतकऱ्याने आंब्याच्या बागा लावण्याची उपयोगिता लक्षात घेतली व त्या कार्यात दृढ संकल्पाच्या बळावर समर्पित झाला. परिणामी त्याने आपल्या त्या क्षेत्रातील गांवा-गांवात फिरून एक हजार आम्र उद्याने उभारलीत. त्या 'हजारी' शेतकऱ्याची तळमळ व जिद्दीने प्रभावित होऊन लोकांनी त्या जिल्ह्याचे नाव 'हजारीबाग' ठेवले. हजार बागांचा हजारी बाग. प्रश्न योग्यता किंवा साधन सुविधांचा नव्हे, तर तळमळ व निष्ठापूर्ण ध्यासाचा आहे. हा ध्यास अंत:करणापासून लागला म्हणूनच शीरीचा प्रेमी फरहाद एकट्याच्या पुरुषार्थ व जिद्दीच्या बळावर बत्तीस मैल लांब कालवा पहाडातून खोदून पूर्ण करण्याचे आव्हान पूर्ण करू शकला. संकुचित स्वार्थांच्या बेड्यांनी जखडलेल्यांना आपली तृष्णा भागवू शकणे देखील कठीण जाते; परंतु उदार अंत:करणाच्या व्यक्ती वेळ, परिश्रम व मनोयोगाला वाचवू शकतात व त्यांच्या साह्याने कितीतरी महत्त्वपूर्ण कार्ये करीत राहू शकतात. स्वत:ला धन्य व अमर करू शकतात.



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

असेच वातावरण एकविसावे शतक येण्या पूर्वी तयार करून घेतले जाईल, असे खात्रीपूर्वक सांगता येते.

## प्रशिक्षण सत्रांची व्यवस्था

प्रतिभा शोधन आणि नवसृजनाचा राजमार्ग बनविण्यासाठी शांतिकुंज आपल्या आगळ्या वेगळ्या पद्धतीने कार्य करीत आहे. या प्रकल्पांतर्गत युगशिल्पी घडविणे, त्यांचे अभिवर्धन करणे प्रमुख कार्य आहे. कमी वेळात, कमी साधनांद्वारे जास्त व्यक्तींना प्रशिक्षित करण्यासाठी कमी दिवसांची प्रशिक्षण सत्रे आयोजित करावी लागतात. विशेष योग्यता संपादन करण्यासाठी एक महिन्याचे आणि कार्यव्यस्त व्यक्तींसाठी ९ दिवसांचे सत्र निर्धारित केले आहे. प्रत्येक महिन्यात १ ते ९, ११ ते १९ आणि २१ ते २९ तारखांमध्ये ही नऊ दिवसांची सत्रे संपन्न होत असतात. या सत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यक्तींनी आपला पूर्ण परिचय प्रार्थना पत्रात नमूद करून पाठवावा, त्यानंतरच त्यांना इच्छित सत्रात सहभागी होण्याची परवानगी मिळू शकते. इच्छित सत्रात जागा भरल्या असतील तर लगतच्या पुढील सत्राची परवानगी मिळते.

शिकलेले, समर्थ, उत्साही आणि अनुशासन प्रिय प्रौढ पुरुषांप्रमाणेच अशा सुयोग्य स्त्रियांना देखील या प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल. ५ वर्षांखालील मुले मात्र सोबत नसावीत कारण त्यांच्या बाल सुलभ हट्टी, खेळकर व खोडकर स्वभावामुळे अव्यवस्था उत्पन्न होते. त्यामुळे आई सोबतच इतर प्रशिक्षणार्थ्यांचे पण ध्यान विचलित होते. या कारणेच वरील प्रतिबंध लागू केला आहे.

## आपल्या काळातील महान आंदोलन- स्त्री जागृती

युगसंधीच्या याच बारा वर्षांमध्ये एक दुसरे मोठे "नारी जागृती" चे प्रचंड आंदोलन वेगाने उफाळून येत आहे. या संदर्भात बऱ्याच वर्षांपासून किरकोळ प्रयत्न होत आहेत. न्याय देवतेचे सुरुवाती पासून हेच प्रतिपादन आहे की, "स्त्री व पुरुष एक समान" चे तथ्य सनातन आहे. गाडीच्या दोन्ही चाकांना सारखेच महत्त्व मिळायला हवे. मानवजातीच्या स्त्री व



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

पुरुष या दोन्ही पक्षांना समान श्रेय-सन्मान, महत्त्व व अधिकार मिळायला हवेत. या प्रतिपादना नंतरही बलिष्ठतेच्या अहंकाराने स्त्रीस पुरुषांने पाळीव प्राण्यांप्रमाणे मानले व वागविले आहे. तिचे शोषण करण्यात पुरुष वर्गाने कुठलीच कंजुषी केली नाही. सुधारकांचे प्रयत्न देखील मोजक्या क्षेत्रातच काही प्रमाणात यशस्वी झाले. समग्र परिवर्तनाचे वातावरण बनूच शकले नाही. परंतु प्रस्तुत काळ हा विलक्षण काळ आहे की ज्यामध्ये हजारो वर्षांपासून प्रचलित असलेल्या दुष्ट चालीरीतींच्या बेड्या कच्च्या धाग्या प्रमाणे तटातट तुटून गळून पडत आहेत. युगसंधीच्या या बारा वर्षांमध्ये भारतातील स्त्रियांना शासन व्यवस्थेमध्ये ३० टक्के आरक्षण मिळून प्रतिनिधित्वाचा मौलिक अधिकार प्राप्त होणार आहे. येत्या काही दिवसातच प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांचे प्रमाण व गौरव भारतातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात वाढतच जाईल.

याच प्रकारे अन्य संपन्न देशांमध्ये स्त्रियांची स्थिती पुरुषांएवढीच झाली आहे. त्या देशातील स्त्रिया महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये उच्च पदांपर्यंत पोहचून असे सिद्ध करीत आहेत की स्त्रिया, पुरुषांपेक्षा कुठल्याच बाबतीत मागे नाहीत. इस्लाम धर्मात स्त्रियांवर जास्त प्रतिबंध आहेत. स्त्रियांकडे शासन संस्था सोपविण्याचे विधान नसले तरी पाकिस्तानच्या बेनजीर भुट्टोंनी पंतप्रधानाचे पद भूषविले होते. त्यांनी एका नव्या परंपरेस जन्म दिला होता.

भारतातील स्त्री जागृती एका आगळ्या वेगळ्या प्रकारे झाली. या अभिनव उपक्रमाद्वारे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढेल. प्रगतिपथावर वाटचाल करण्याचा मनोरथ प्रकर्षाने उसळी घेईल. या वेळी पुरुषांचा कल खीळ घालण्याचा नसेल, तर उदारतापूर्वक सहयोग देण्याचा असेल.

'शांतिकुंज' चा निश्चय आहे की भारतातील प्रत्येक शहरात व खेडे गावात जाऊन स्त्रियांना भविष्य कालीन संभावना विषयी ओळख व जाणीव करून द्यावी. त्यांनी प्रगतिशील बनावे यासाठी त्यांच्यात अदम्य उत्साह जागविला जाईल. या साठी पहिला कार्यक्रम असा हाती घेण्यात आला आहे की, २४ हजार महिला दीपयज्ञ अशा प्रकारे संपन्न केले जातील की



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

त्यामध्ये देशातील अधिकांश भगिनींना एकत्रित व संघटित करणे शक्य व्हावे. यासाठी सुशिक्षित स्त्रियांना नेतृत्व करण्यासाठी, मोर्चा सांभाळण्यासाठी खास करून निमंत्रित करण्यात आले आहे. या भगिनी आपापल्या निकटवर्ती क्षेत्रामध्ये या आंदोलनास चरमोत्कर्षाप्रत पोहचविण्यात व्यस्त राहतील.

दीपयज्ञ फारच सुगम, अत्यल्प खर्चाचे व प्रेरणाप्रद सिद्ध झाले आहेत. या दीपयज्ञांमध्ये पुण्य-परमार्था बद्दल श्रद्धा जागृत करण्याच्या प्रक्रियेचा देखील पुरेपूर समावेश आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पुरुष प्रधान दीपयज्ञ आशातीत यशस्वी झाले आहेत. यांच्या माध्यमातून लोकांनी आत्म परिशोधन व लोक कल्याणासाठी हिरीरीने व्रते घेतली, संकल्प केले. आता महिला प्रधान यज्ञांची पाळी राहील. त्यामध्ये पुरुष सहयोगी म्हणून सामील होतील व यज्ञीय कार्यक्रम यशस्वी बनविण्यात मोलाचे योगदान देतील. केंद्राने पाठविलेल्या प्रचारक कार्यकर्त्यांच्या टोळीऐवजी स्त्रियांना, हा मोर्चा सांभाळण्यासाठी विशेष करून प्रोत्साहित व प्रशिक्षित केले जात आहे. या कार्यक्रमांसोबतच महिला मंडळांची जडण-घडण व स्थापना करून संघटन सुरू केले जाईल. एकाचे पाच, पाचचे पंचविस बनण्याचा उपक्रम हा नवसृजनाचा आधारभूत सिद्धांत आहे. या आधारे प्राणवान-जागरूक महिलांच्या सुसंघटित टोळ्या प्रत्येक क्षेत्रात उभ्या झालेल्या दिसतील.

महिला आंदोलन येत्या काही दिवसातच दोन कार्ये हाती घेईल. एक शिक्षण व स्वावलंबनाच्या तंत्रास प्रोत्साहन; व दुसरे कार्य धूम-धडाक्याच्या खर्चिक विवाह सोहळ्यांना महिला समुदायाचा असहयोग. परंपरा व रूढीवादाच्या नावाखाली प्रतिगामी तत्त्वांनी खुळ्या समजुती, अंध परंपरा, घातक कुप्रथा-रूढी व गळचेपीने स्त्री समाजास आपल्या मगरमिठीत घट्ट आवळून घेतले आहे. अवाढव्य खर्चाच्या विवाहांनी मुलगा आणि मुली यांच्या दरम्यान प्रचंड फरक निर्माण केला आहे, भक्कम भिंत उभी केली आहे. ती पूर्णपणे जमीनदोस्त करण्याची हीच वेळ आहे. सून व मुली मध्ये फरक न करणारा दृष्टिकोन या आंदोलनाशी जुळला आहे. जर भावी पिढीचे नेतृत्व करायचे असेल त्यांना स्वतःला सुशिक्षित, सुयोग्य,



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

दक्ष व प्रगतिशील बनायच आहे व इतरांनाही तसे बनवायचे आहे. २४ हजार यज्ञीय कार्यक्रमांशी जिथे महिला संघटनांचे सहयोग-सहकार्य प्रत्यक्ष लाभते, तिथे असा उत्साह निर्माण करणे आवश्यक आहे की त्यांनी सर्व प्रकारे सुयोग्य बनण्यात कुठलीच काटकसर व उणीव ठेवू नये.

येत्या ५ वर्षांमध्ये एकही स्त्री अशिक्षित राहणार नाही तसेच अति थाटमाटाचे खर्चिक विवाह कुठेच आढळून येणार नाहीत. अशी आशा आहे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने खांद्यास खांदा लावून काम करताना दिसतील.

जनसेवी जीवनदानी केवळ पुरुषांमधूनच निर्माण न करता, महिला कार्यकर्त्यांनी देखील पुढे यावे, अशी योजना आहे ज्यांना लहान मुले आहेत त्यांनी जवळपासच्या क्षेत्रात काम करावे व ज्यांच्यावर लहान मुलांची जबाबदारी नसेल त्यांनी स्त्री जागृतीचे, उत्थानाचे वादळ उठवून घरोघरी जागृती निर्माण करण्यासाठी खऱ्या अर्थाने देवीची भूमिका संपन्न करून दाखवावी.सर्व प्रथम महिला वर्गातच साक्षरता संवर्धनाची धडक मोहीम हाती घेतली जाईल. म्हटलेच आहे की, "आई जर अजाण तर कशी होतील मुले सुजाण" साक्षर होताच त्यांना असे साहित्य दिले जाईल, जे त्यांना नव युगानुरूप चेतना प्रदान करण्यास सक्षम असेल. पुरुषांचे प्रतिभा संवर्धन आंदोलन चालविण्या व्यतिरिक्त स्त्री जागृतीचा प्रकाश व प्रेरणा देणारे साहित्य देखील आवश्यक आहे. शांतिकुंज येथे तसे साहित्य देशातील सर्व भाषांमधून प्रकाशित करण्याचा निर्धार केला आहे.

## विचार क्रांती- जनमनाचे शोधन व उन्नयन

लहानसे घर जरी बांधायचे असले तरी त्या साठी किती साधन सामग्री जमवावी लागते, याचा अनुभव ज्यांनी घेतला त्यांनाच ते माहीत असते, तर मग भग्नावस्थेतील जगास नव युगाच्या भव्य भवना मध्ये परिवर्तित करण्यासाठी, विकसित करण्यासाठी किती अधिक कौशल्याची, साधनांची, प्रतिभावंतांची गरज भासेल, हा अंदाज करणे कोणालाही जड जाऊ नये. सुधारणा व निर्मितीच्या दोन आघाड्यांवर दुधारी तलवारीने लढल्या जाणारा हा पुरुषार्थ किती व्यापक व प्रचंड आहे. प्राचीन काळच्या



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

समुद्र सेतु बंधन, लंका दहन, गोवर्धनपर्वत उचलणे व संजीवनी बुटीचा पर्वत उचलून आणण्यासारखाच हा पुरुषार्थ कठीण असला पाहिजे. यास अगस्ती ऋषीच्या समुद्रप्राशना समान विलक्षणच मानावे लागेल. वेळोवेळी झालेल्या अवतारांच्या युगांतकारी परिवर्तनांसमानच याला म्हणता येईल.

पूर्वी जगाची लोकसंख्या फारच कमी होती. दोन हजार वर्षांपूर्वी जगात सुमारे तीस कोटी लोक होते. त्यापैकी फारच थोडे दुर्जन दुष्ट प्रवृत्तीचे होते. तेच विध्वंसक कृत्ये करीत. परंतु त्यांना नियंत्रित करण्यासाठी परशुरामाने आपल्या परशुचा उपयोग केला होता, कारण त्यांचे निर्दालन करणे अत्यावश्यक होते. त्यांनी अशा दुष्टांची, उन्मत्तांची डोकी उडविली. म्हणजेच त्यांचे विचार, चिंतन, दुष्प्रवृत्ती समूळ नष्ट केली होती. आज जगाची लोकसंख्या सुमारे ६५० कोटी आहे. या पैकी बहुतांशी लोक विचार विकृती आणि आस्था संकटाने ग्रस्त आहेत व तेच इतर भल्या लोकांना त्रस्त करीत आहेत. अधिकांश व्यक्तींचे चिंतन मानवीय गौरवानुकूल नाही. दुष्प्रवृत्ती प्रत्येक क्षेत्रावर कब्जा करीत आहेत. यांच्या निर्मूलनासाठी व्यापक विचारक्रांतीची नितांत गरज आहे.

एका विशिष्ट उद्दिष्ट पूर्तीसाठी केलेल्या लहान-सहान क्षेत्रीय क्रांती किती जड गेल्यात हे इतिहासकार जाणतात. आता मनोभूमीत व्याप्त आणि अभ्यस्त अशा दृष्टिकोनाचे आमुलाग्र परिवर्तन करायचे आहे. हेच जनमनाचे शोधन आहे. अवांछनीय वृत्ती-प्रवृत्तींचे उन्मूलन आणि सत्प्रवृत्तींचे संवर्धन हेच आहे. हे कार्य पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत संपन्न करणे एवढे प्रचंड काम आहे की, ते पूर्ण करण्यासाठी हजारो परशुराम सुद्धा कमी पडतील. असे असले तरी हे मात्र निश्चित की ही भवितव्यता संपन्न होईलच होईल. शालीनता, आत्मीयता, सद्भाव व सहकार्याचे नवयुग अवतरित झाल्याविना राहणार नाही. या पुण्य प्रवाहास गतिशील करण्यासाठी असंख्य भगीरथांची गरज भासेल. विध्वंस करणे सोपे आहे पण नवनिर्मिती करणे अतिशय कठीण असते. आगपेटीची एक काडी संपूर्ण घर व गाव जाळून राखरांगोळी करण्यासाठी पुरेशी असते. पण एक गांव वसविण्यासाठी अनेक समर्थ व्यक्तींचे कौशल्य व



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

प्रचंड साधन सामग्री त्याच प्रमाणे प्रदीर्घ कालावधीची आवश्यकता असते.

## सृजन कार्यासाठी समयदान

युगसंधीच्या उर्वरित वर्षामध्ये शांतिकुंजला कित्येक अति महत्त्वपूर्ण कार्ये संपन्न करावयाची आहेत. हाती घेतलेल्या सर्व कार्यांना द्रुतगतीने पूर्ण केले जात आहे. या कालावधीत एक लक्ष समाज सेवक दर्जाचे असे स्त्री-पुरुष तयार करायचे आहेत, जे पूर्ण वेळ जरी या कामी देऊ शकत नसतील तरी दररोज काही तास नियमितपणे आपल्या क्षेत्रामध्ये नवनिर्मिती व सुधारणात्मक कार्यार्थ देऊ शकतील. इ.स. २००० पर्यंतच या महापरिवर्तनासाठी एक कोटी सहयोगी-भागीदार बनविण्याची योजना होती व ती यशस्वी झाली असून हे सर्व युगसंधीच्या पूर्णाहुतीमध्ये सहभागी होऊन, पुढील काळात पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या व्रतशील बनून स्वीकारतील.

अशिक्षित जनतेस या आधारे साक्षर बनवायचे आहे की वर्तमान सुशिक्षित व्यक्ती सरासरी दहा निरक्षरांना साक्षर करण्याचा संकल्प घेईल व विद्या ऋणातून मुक्त होईल. हे आंदोलन शिक्षण संवर्धनाचे असे कार्य करू शकेल, जे अनेक नवीन शाळा सुरू करून व त्यांच्यावर अपार धन-राशी खर्च करूनही शक्य होणार नाही. दुष्ट रूढी व परंपरांपैकी विवाह विकृतीचे निवारण करण्यासाठी बिना थाटामाटाचे, हुंडा विरहित, कमी खर्चाचे विवाह हल्ली बोटावर मोजण्या एवढेच होतात. यांचे प्रमाण वाढवून साध्या व कमी खर्चाचे विवाह करण्याचे प्रचलन रूजविले व तसे वातावरण विनिर्मित केले जाईल. या सोबतच अन्य कुप्रथा, अंधविश्वास, अनाचार कमी होऊन नष्ट होत जातील. प्रत्येक व्यक्तीस नवसृजनासाठी काही ना काही समयदान व अंशदान नियमितपणे देत राहण्यासाठी प्रवृत्त केले जाईल. या त्यांच्या थोड्याशा कां होईना, सहयोगाने प्रत्येक क्षेत्रामध्ये अनेक सृजनात्मक सत्प्रवृत्ती विकसित व दृढमूल होऊ शकतील.

निरक्षरतेच्या कुंभकर्णी झोपेतून जेव्हा दोन तृतीयांश जन समुदाय जागा होईल व चेतन स्थितीत येईल, तेव्हा निश्चितंच त्याची ज्ञान पिपासा



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

वाढत जाईल. बौद्धिक क्षुधा त्यास व्याकूळ करेल. तिची पूर्ती जर उपयुक्त युग साहित्याने करता आली नाही तर त्याचा परिणाम असा होईल की अभक्ष भक्षणा सारखेच लोक विकृत साहित्य सुद्धा वाचू लागतील. परिणामी अशिक्षित राहिल्याने होणाऱ्या हानी पेक्षा ही अधिक नुकसान करून घेतील. म्हणून येणाऱ्या नव युगातील मनुष्यासाठी अभिनव अशा प्रेरक व उपयुक्त साहित्यास प्रत्येक भाषेत प्रस्तुत करण्याची नितांत गरज आहे. ही व्यवस्था अत्यंत बिकट, भारी खर्चाची व भगीरथी प्रयत्नांची असली तरी कोणत्याही परिस्थितीत ती पूर्णच केली जाईल.

हल्ली प्रज्ञा परिजनच प्रामुख्याने नवसृजनाचे आंदोलन सर्वत्र चालवीत आहेत. परंतु येत्या काही दिवसातच या समुद्र मंथनामध्ये उच्च प्रतिभासंपन्न, विचारवंत सहभागी होतील असा दृढ विश्वास आहे. प्रखर बुद्धीचे धनी, धनवान, प्रतिभाशाली कलाकार, उदार अंतःकरणाचे महामानव या प्रतिभाशालींच्या उच्च श्रेणीत मोडतात. त्यांचे मनपरिवर्तन होईल. आज ही मंडळी ज्या स्वार्थ व नावलौकिकाच्या मागे बेभान धावत आहेत, हीच मंडळी या पेक्षाही दहा पाऊले पुढे जाऊन अशा कार्यांना हाती घेईल की ज्यांना करण्यासाठी काळाची गरज, महाकालाची हाक त्यांना प्रेरित व विवश करेल. सामान्यजनांसाठी त्याग करणे तसे कठीणच आहे. परंतु परीक्षेच्या घडीमध्ये मानवी अंतःकरणात निवास करणारी अंतःश्चेतना सुद्धा उसळी घेते आणि असे कार्य करवून घेते की जे करण्याचा त्यांना पूर्वी अनुभव, ज्ञान व सराव नव्हता. बुद्ध काळात लाखो परिव्राजक, महात्मा गांधींच्या काळात लाखो सत्याग्रहींचे स्वयं प्रेरणेने, स्वच्छेने एकाएकी पुढे येणे हेच सिद्ध करते की काळाच्या हाकेस भलेही स्वार्थलिप्त न ऐकोत, परंतु जागृत व मानवतावादी व्यक्ती युगधर्माचे पालन करण्यास कसा नकार देतील? अशा प्राणवानांना झोपेतून हलवून जागे करणे व नंतर आळस झटकून ताठ उभे करण्यासाठी शांतिकुंजचे तंत्र आतापासूनच आवश्यक ती सर्व तयारी करीत आहे. या एकविसाव्या शतकात अशा व्यक्तींची कुठेच, कमतरता भासणार नाही. अशा व्यक्तींचा महापूर येत असल्याची प्रचीती युगसंधिकाळात सर्वांनाच येईल.



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

अधिकांश नद्या हिमालयातून निघाल्या आहेत. तुलना केल्यास शांतिकुंजला सुद्धा असेच काही करताना जग पाहू शकेल, की ज्यामध्ये असंख्य व्यक्तींना दिशा व प्रेरणा स्रोत उपलब्ध होत राहतील. या जनरेटरच्या ऊर्जेने मानवीय विद्युत उपकरणांना गतिशील होण्याची शक्ती मिळू शकेल.

## दैवी सत्तेचे सूत्र संचालन

अशी महान कार्ये महाकालाच्या तत्त्वावधानामध्ये, त्याच्याच नियोजित-निर्धारित योजनेनुसार संपन्न होतील. तोच अणूला विभू व विभूला अणू बनवितो, राईचा पर्वत व पर्वताची राई करतो. विधाता निराकार असल्यामुळे प्रत्यक्षात कुंभाराप्रमाणे निर्मिती करतांना दिसू शकत नाही. महान कार्ये महान व्यक्तींकडूनच संपन्न झाली आहेत. ही महानता सामान्य मनुष्याची नसते, तर ती त्याच सर्व शक्तिमानाच्या योजनेनुसार घडत असते. तीच सृजन, पालन पोषण व नियंत्रणासाठी पूर्णपणे जबाबदार आहे. दैवीसत्ताच वेळोवेळी धर्माची हानी रोखण्यासाठी व अधर्माचा महापूर थोपविण्यासाठी आपल्या ऊर्जेचे विलक्षण प्रयोग करीत असते. जिने मनुष्या सारखा अद्‌भुत प्राणी घडविला, जिच्या नेतृत्वात विश्वाच्या सर्व व्यवस्थेची देखरेख केली जाते ती परमात्मसत्ता जी योजना बनवेल ती अपूर्ण कशी राहील ? त्याच्या संकल्पात व नियोजनांमध्ये कोण अडथळा आणू शकेल ?

सर्व महत्त्वपूर्ण कार्ये परमेश्वर करतो व त्यांचे श्रेय शरीर धारी फुकटातच पदरात पाडून घेतात. चेतना काम करते व श्रेय मात्र शरीरास मिळते. भयंकर वादळामुळे झाडांची पाने व गवताच्या काड्या देखील आकाशाला जाऊन भिडतात. नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत जाणारी फांदी परिश्रम न करताच सहज समुद्रास जाऊन मिळते. तिचा हा प्रदीर्घ प्रवास अनायासेच होतो. दैवीसत्तेच्या सहाय्याने सुदामा, नरसी मेहता, विभिषण, सुग्रीव, शबरी, खार, अस्वल, वानर इत्यादींनी ते श्रेय प्राप्त केले होते, जे त्यांनी स्वतःच्या सामर्थ्यावर कदाचितच प्राप्त केले असते. श्रेयाधिकाऱ्यांनी पुढे यावे व असे श्रेय प्राप्त करावे, जे असंख्य लोकांसाठी प्रेरणाप्रद बनावे, तसेच अनंत काळापर्यंत अनुकरणीय व अभिनंदनीय मानले जावे, याकरिता तीच सत्ता हल्ली स्वतः उत्सुक व प्रयत्नशील आहे



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

दिव्यसत्तेचे महत्त्वपूर्ण प्रतिनिधित्व आपल्या स्वत:मध्येच आहे. त्यास आत्मशुद्धी, आत्मोन्नती व लोककल्याणकारी साधने द्वारे सहजच अभिष्ट सहयोगासाठी आमंत्रित केले जाऊ शकते. अर्जुन, हनुमान यांना असाच दिव्य सहयोग मिळला होता. असंख्य महामानव या आधारे कृतकृत्य झालेत. युग निर्माण योजनेद्वारे संपन्न झालेली अगणित जन कल्याणकारी उपयुक्त कार्ये कोणा एकाच्या पुरूषार्थाने नव्हे, तर दैवी प्रेरणा व कृपेच्या अनुदानामुळेच आश्चर्यजनक रीत्या विकसित, व्यापक व यशस्वी होत आली आहेत.

शांतिकुंजने इ.स. १९८९ पासून इ.स. २००० वर्षांच्या अवधीत एक विस्तृत योजना व कार्यपद्धती बनवली आहे. वातावरणात असाधारण उत्साह व साहस भरण्याचा प्रयत्न केला आहे. याच्या मागे दैवी शक्तीचे समर्थन असल्याकारणाने हे अभीष्ट उद्दिष्ट निश्चितच पूर्ण होऊ शकेल.

या संघटनेचे संस्थापक संचालक आपल्या ८० वर्षाचा प्रदीर्घ जीवन काळात संपन्न झालेल्या सर्व कार्य योजनांमागे दैवीशक्तींची अनुकूलता व कृपाच प्रधान कारण असल्याचे मानतात. ते म्हणतात की त्यांनी सामान्य मन:स्थिती व स्वल्प साधने लक्षात घेता जे काही संपन्न होऊ शकले ते एवढे अधिक आहे की त्यास गोवर्धन पर्वत उचलण्या समान मानता येईल. साहित्य निर्मिती, संघटन, सृजनात्मक आंदोलन, हजारो प्रज्ञा केंद्रांची निर्मिती या सारखी सर्वविदित कार्ये अशी आहेत की ज्यांच्या विषयी सविस्तर माहिती जाणून घेतल्यावर साहजिकच एवढे सर्व काही एका व्यक्तीद्वारे शक्य होऊ शकेल असा विश्वास बसत नाही. ही तथ्ये तर एकच संकेत करतात की एखाद्या कुशल कलाकाराच्या बोटांच्या संकेताने, मार्गदर्शन व सहयोगानेच हे सर्व घडू शकले आहे. येत्या काही दिवसात जे या तंत्राद्वारे संपन्न करावयाचे आहे त्याची रूपरेषा समजून घेतल्यावर सामान्य बुद्धीस खात्रीपूर्वक सांगणे कठीण आहे की विश्वव्यापी सृजन कार्यांमध्ये जेवढ्या प्रतिभा व जेवढ्या साधनांची आवश्यकता आहे, त्यांची व्यवस्था होणार की नाही? परंतु त्यांनी ही सर्व कामे पूर्ण करण्याचा निश्चय केला आहे. समस्या एवढ्या प्रकारच्या, एवढ्या कठीण व व्यापक आहेत की त्यातून मार्ग काढण्यासाठी स्थूल शरीराची क्षमता कमी पडते.



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

त्या महान कार्यास संपन्न करण्यासाठी सूक्ष्म शक्तीस आधार बनवूनच मोठ्या क्षेत्रामध्ये मोठी कामे केली जाऊ शकतात. प्रतिभावंतांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करण्याच्या संदर्भात सुद्धा हीच गोष्ट लागू होते. उलट्याला उलटून सरळ करण्याचा व्यापक कार्यक्रम देखील तेवढाच कठीण आहे. या साठी स्थूल शरीर साहाय्यकारी नव्हे, तर बाधकच सिद्ध होते. म्हणूनच निर्णायकांनी वर्तमान स्तर बदलून टाकण्याचा निश्चय केला आहे. त्या करिता आता फारच थोडा वेळ लागेल.

इंजिना शिवाय गाडी कशी चालेल? अशी शंका घेऊ नये, इंजिनास जाणून घ्यायचे असेल तर सूत्र संचालकांच्या अदृश्यसत्तेच्या सामर्थ्याचे आकलन केले पाहिजे. परम पूज्य गुरुदेवांनी या कार्याची पूर्ण तयारी करून ठेवली आहे. ते सांगतात की इ.स. २००० पर्यंत संपन्न केल्या जाणाऱ्या विशाल योजनेच्या उपक्रमास पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रतिभाशाली व्यक्तित्त्व, आवश्यक साधने व स्वसंचालित तेजास गतिशील करण्याची व्यवस्था करून ठेवली आहे. त्या बरोबरच आश्वासन दिले की, खात्री बाळगा, ते सर्व काही, शरीराने अस्तित्वात राहिले नसतानाही सुनिश्चितपणे सुरळीत सुरू राहील. अश्रद्धाळू जन या विषयी संदेह व्यक्त करू शकतील, परंतु महाकालाच्या सत्तेवर, क्षमतेवर ज्यांना पूर्ण विश्वास आहे, ते अनुभवू शकतील की जी प्रक्रिया ८० वर्षांपासून पावलापावलागणिक यश प्रदान करीत आली आहे, ती आपल्या समर्पित शिष्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या सुद्धा स्वतःच सांभाळून घेईल आणि जे अभीष्ट आहे, त्यास अवश्य पूर्ण करील. संचालकांनी तर इ.स. २००० पर्यंतच्या अखंड ज्योती मासिकाचे संपादन व पुढे छापल्या जाणाऱ्या साहित्याचे सृजन देखील करून ठेवले आहे. आपल्या मागे असे उत्तराधिकारी घडवून ठेवलेत की जे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता मोठ्यात मोठी पाऊले उचलण्यात चुकणार नाहीत, कचरणार नाहीत.

पृथ्वीच्या बिकट आवश्यकता लक्षात घेऊन, दैवी विधानाने गंगेस स्वर्गातून पृथ्वीवर पाठविण्याचा पूर्ण निश्चय करून ठेवला होता. निमित्त बनण्यासाठी माध्यमाची गरज भासली व त्यासाठी भगीरथाच्या रूपात ते सहज चालून आले. या वेळी ज्ञान गंगा संपूर्ण विश्वाला सिंचित



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org

करण्यासाठी व समस्त मानवजातीचे कल्याण करण्यासाठी अवतरित होत आहे. स्वेच्छेने किंवा नियंत्याच्या विधि-व्यवस्थेच्या अनुशासनात, जसे शक्य असेल तसे, उज्ज्वल भविष्याची संभावना साकार करणाऱ्या ज्ञान गंगेचे अवतरण सुनिश्चित आहे. तिचे स्वागत पूजन-अर्जन करण्याच्या आवश्यकतेची पूर्ती करण्यासाठी असंख्य भावनाशील रांगेत सज्ज असलेल्या विशाल सैन्याप्रमाणे उभे असलेले दिसतील काय? एवढ्या कमी वेळात ते एकत्र जमू शकतील काय? ज्यांना महाकाळाची इच्छा व योजना सफल होण्याचा विश्वास आहे, ते या प्रतिपादनावर श्रद्धा ठेवू शकतात की राईचा पर्वत बनविणाऱ्या शक्तीचे नियोजन स्वल्प साधने आणि स्वल्प व्यक्तींच्या माध्यमातूनही शक्य होऊ शकते.

या मिशनचे सूत्र संचालक आपल्या दिव्य व सूक्ष्म शक्तीचा व्यापक विस्तार करून एकविसाव्या शतकाचे गंगावतरण योग्यवेळी केल्या शिवाय राहणार नाहीत. त्या अनुग्रहाचा वेळीच सदुपयोग करण्यासाठी श्रेयार्थी परिजनांनी वेळीच कटिबद्ध होण्याची गरज आहे.

युग देवतेने प्रत्येक प्राणवान जागृत व्यक्तींना या अतिमहत्त्वपूर्ण समयी आसक्ती व वासनांची तसेच कुत्सित इच्छा-आकांक्षांची बंधने सैल करून नव सृजनाच्या दैवी अभियानामध्ये सहभागी होण्यासाठी हाक दिली आहे. ही ईश्वरी योजना सफल तर कोणत्याही परिस्थितीमध्ये होणारच आहे. प्रश्न त्या सुयोग, सदभाग्याचा आहे, ज्यास वेळीच जागे होणारे, आवश्यक ते साहस दाखविणारेच प्राप्त करीत असतात.

एकाविसावे शतक आपल्या आगळ्या वेगळ्या प्रकारच्या समग्र क्रांतीस सोबत घेऊन वाढत्या वेगाने येऊन धडकले आहे. या शतकात आनंद व उल्हासाने परिपूर्ण असे नवसृजन या धरतीवर होणार आहे. आसुरी शक्ती व अवांछनीय तत्त्वांचा किल्ला कोसळणारच आहे. या भवितव्यतेमध्ये सहयोगी बनून समस्त विश्वाचे तर भले करताच येईल, शिवाय स्वत:साठी देखील तसलेच सद्भाग्य प्राप्त करता येईल व त्याच्या प्रभावाने येणाऱ्या पिढ्या देखील कृतकृत्य होऊ शकतील.

◈◈◈◈◈



Free Read/Download & Order 3000+ books authored by Yugrishi Pt. Shriram Sharma Acharya(Founder of All World Gayatri Pariwar) on all aspects of life in Hindi, Gujarati, English, Marathi & other languages at
www.vicharkrantibooks.org http://literature.awgp.org